दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.९ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २२३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 9 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 223 ● Pages 4 ● Rate 4 Rs



**प्रतिनिधी नेमणे आहे**

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा , तालुका , सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .


# माझ्या परवानगीशिवाय माध्यमांशी संवाद साधू नका:सोशल मीडियावर व्यक्त होऊ नका

## मीरा रोड मोर्चानंतर राज ठाकरेंचा पदाधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मुंबईत सध्या मराठी-अमराठी वाद सुरू असून, याबाबत मनसेने आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. मराठीच्या मुद्द्यावरून वाद सुरू असताना आता मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना प्रसारमाध्यमांशी न बोलण्याचे आणि कोणतीही प्रतिक्रिया सोशल मीडियावर व्यक्त न करण्याचे आदेश दिले आहेत. यासंदर्भात राज ठाकरेंनी सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. तसेच प्रवक्त्यांनी पक्षाची बाजू मांडण्यापूर्वी माझी परवानगी घ्यावी, असेही राज ठाकरे यांनी आदेशात म्हटले आहे.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मीरा भाईंदर मध्ये काढण्यात आलेल्या मराठी स्वाभिमान मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या वतीने या परिसरामध्ये कलम १४४ लागू करण्यात आले होते. मनसेच्या शेकडो पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. अखेर पोलिसांच्या विरोधाला झुगारुन मनसेने हा मोर्चा काढला आणि आंदोलन यशस्वी केले. आंदोलनाच्या यशानंतर राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना माध्यमांशी संवाद न साधण्याचे आदेश दिले.

एक स्पष्ट आदेश... पक्षातील कोणीही वर्तमानपत्रं, वृत्तवाहिन्या किंवा कोणत्याही डिजिटल माध्यमांशी संवाद साधायचा नाही. तसंच स्वतःचे प्रतिक्रियांचे व्हिडीओज सोशल मीडियावर टाकायचे हे पण अजिबात करायचं नाही.

आणि माध्यमांशी संवाद साधण्याची अधिकृत जबाबदारी ज्या प्रवक्त्यांना दिली आहे त्यांनी देखील मला विचारल्याशिवाय, माझी परवानगी घेतल्याशिवाय



कुठल्याही प्रकारच्या माध्यमांशी संवाद साधायचा नाहीये, आणि सोशल मीडियावर व्यक्त व्हायचं नाही.दरम्यान, मराठी बोलण्यास नकार देणाऱ्या व्यापाऱ्याच्या कानशिलात लगावणाऱ्या मनसेविरोधात परप्रांतीय व्यापाऱ्यांनी मोर्चा काढला. त्या मोर्चाला प्रत्युत्तर देण्यासाठी ८ जुलै रोजी मीरारोड येथे मनसे, ठाकरे गटाची शिवसेना आणि मराठी एकीकरण समितीच्या नेतृत्वाखाली विराट मोर्चा काढण्यात आला होता. यामध्ये मराठी भाषेसाठी एकत्र आलेल्या नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद दिसून आला. मात्र, मोर्चादरम्यान अनेक मनसे पदाधिकाऱ्यांना स्थानबद्ध करण्यात आले होते, तसेच काही मनसे पदाधिकाऱ्यांची धरपकड देखील झाली होती. या मोर्चानंतर राज ठाकरे लवकरच मीरा रोड येथे भेट देणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, मीरा रोड येथील मोर्च्याच्या परवानगीवरून शिंदे गटातील नेत्यांमध्येही सकाळपासून मतमतांतरे दिसून आलेत. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी मोर्च्याला परवानगी नाकारण्याचे स्पष्टीकरण दिले, तर आमदार प्रताप सरनाईक यांनी मराठी माणसांच्या मोर्च्याला परवानगी का नाकारली गेली? असा थेट सवाल उपस्थित केला. तर या मोर्चाला परवानगी का नाकारली? याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पोलिस महासंचालकांना जाब विचारला असून, परवानगी नाकारून पोलिसांना बदनाम करण्याचा हेतू होता का? याबाबत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश फडणवीसांनी दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

# कर्तव्यदक्ष तलाठी मॅडमच्या पाठीशी जीवाचीवाडी गावकरी; बदनामीच्या प्रयत्नांना गावकऱ्यांचा विरोध

**केज । प्रतिनिधी**

जिथे कर्मचारी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडताना निष्ठेने आणि प्रामाणिकपणे काम करतात, तिथे त्यांच्या कार्याची छाप समाजावर नकळतपणे उमटत असते. केज तालुक्यातील जीवाचीवाडी सज्जात कार्यरत असलेल्या तलाठी श्रीमती अश्विनी गुळभिले मॅडम यांचे कार्य ह्याचं एक उत्तम उदाहरण ठरले आहे.

गावात रुजू झाल्यापासून त्यांनी शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या तितक्याच तत्परतेने सोडवण्याचे कार्य केले आहे. शासकीय योजनांचे लाभ योग्य ते लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, वेळेत सातबारा, उतारे देणे, शेतकऱ्यांचे पुनरावलोकन प्रकरणे मार्गी लावणे अशी अनेक कामे त्यांनी नियमबद्धपणे केली आहेत.

मात्र दुर्दैवाने, काही राजकीय हितसंबंधित व्यक्तींनी केवळ स्वार्थासाठी किंवा प्रसिद्धीच्या हव्यासापोटी श्रीमती अश्वीनी गुळभिले मॅडम यांच्या विरोधात केज तहसिल कार्यालयात तक्रार दाखल केली. मात्र या प्रकाराची माहिती गावकऱ्यांना मिळाल्यानंतर, गावकऱ्यांनी याचा जोरदार निषेध करत मॅडमच्या पाठीशी उभे राहत तहसिलदारांना दिनांक ०७ जुलै रोजी लेखी निवेदन दिले असुन या निवेदनात, गावकरी, शेतकरी व कष्टकरी जनतेने श्रीमती अश्वीनी गुळभिले मॅडम या कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि जनतेशी सुसंवाद ठेवून काम करणाऱ्या अधिकारी आहेत, असे ठामपणे नमूद केले. मॅडमच्या कामामुळे आम्हाला वेळेत सेवा मिळतात, कोणतीही लाच किंवा अडवणूक न करता त्या आपलं काम करतात, असे गावकऱ्यांचे म्हणणे होते.या घटनेंमुळे एक बाब स्पष्ट होते की, प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाठीशी समाज उभा राहतो आणि खोट्या आरोपांपुढे सत्याचे समर्थन अधिक बळकट होते. गावकऱ्यांचे हे पाऊल संपूर्ण तालुक्यासाठी प्रेरणादायक ठरले आहे.

# बातम्या देऊनही राष्ट्रीय महामार्ग अधिकारी यांचा गलथान कारभारामुळे परत अपघात

## रघुनाथराव पेट्रोल पंपाजवळ एसटीचा भीषण अपघात याला जबाबदार कोण-ॲड.संकाये

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी अंबाजोगाई महामार्गावरील कन्हेरवाडी येथे असणाऱ्या रघुनाथ मुंडे पेट्रोल पंपाजवळ बसचा भीषण अपघात झाला त्यामध्ये प्रवासी जखमी झाल्याची माहिती मिळाली वारंवार बातम्या देऊन आणि अधिकाऱ्यांना सांगून सुद्धा महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे हा भीषण प्रकार घडला घडला असून याला जबाबदार कोण असा सवाल सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी केला आहे.

काल रात्री हा अपघात झाला आहे. थातूरमातूर रेडियम चे रघुनाथ मुंडे पेट्रोल पंपाजवळ राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी काम केल्याने ते निघून गेले परिणामी त्या ठिकाणी अपघात झाला या अपघातामध्ये बसचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून त्यामध्ये असणाऱ्या प्रवाशांना सुद्धा शारीरिक हानी भोगावी लागली आहे. अशा वारंवार घटना या अगोदरही याच ठिकाणी घडल्यामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आहे. याकडे संबंधित महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष दिले असते तर अशी घटना घडली नसती भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी योग्य ती उपयोजना करणे गरजेचे आहे. अपघातामध्ये माणसांचा बळी जाण्याची शक्यता आहे त्यामुळे राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा लागेल अन्यथा रेडियमचे काम करून घ्यावे अन्यथा मित्र मंडळाच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



# परळी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत भुरट्या चोरांचा उच्छाद

## भुरट्या चोरांना परळी शहर पोलीस अभय?

**परळी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात पोलीस प्रशासनाचा वचक राहावा म्हणून आय.पी.एस. अधिकारी नवनीत कावंत यांची एस.पी. म्हणून बीड जिल्हा येथे पाठवण्यात आलं, परंतु सुरुवातीला काही दिवस वाटलं होतं, पोलीस प्रशासनाने आपली आलेली मरगळ झटकून कामाला सुरुवात केली आहे. तसा काही जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांनी आव देखील आणला व थातूरमातूर पोलीस कारवाया दाखवून एस.पी.नवनीत कावत यांचे मनही जिंकले. पण कार्यपद्धती बघून अनेकांच्या बदल्या देखील करण्यात आल्या परंतु आता परिस्थिती पहिल्यासारखीच जैसे थे आहे. पोलीस प्रशासनाला सर्वसामान्य जनतेच्या संरक्षणासाठी, अडचणीसाठी, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी काम करावं लागतं, परंतु त्याला हरताळ फासत, पोलीस कर्मचारी व पोलीस अधिकारी काम करत आहेत असंच चित्र सध्या दिसत आहे.

मटका, गुटका, बिंगो, ऑनलाइन लॉटरी,पत्तेचे क्लब,अवैध धंदे, हातभट्टी विक्रेते, यांना खुलेआम विक्री करण्याची परवानगी दिली आहे का ? असे चित्र सध्या परळी शहरात दिसून येत आहे.







**पत्रकार बालाजी जगतकर यांच्याकडून भुरटा चोर पकडून देणारास किंवा माहिती पुरवणारस १०००/-रु चे रोख बक्षीस देण्यात येणार आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. परळी शहरातील जगतकर गल्ली,आदोडे गल्ली, ताटे गल्ली, रमानगर,प्रबुद्ध नगर, साठे नगर,भीमनगर परळी या भागातील भुरटे चोर यांचे फोटो व्हिडिओ किंवा माहिती पाठवण्यासाठी मोबाईल क्रमांक ९९६०१७४५९७**

या सर्व अवैध धंद्यामुळे व्यसनाधीन झालेल्या तरुण व बिघडलेल्या मुलांकडून भुरट्या चोऱ्यांचे प्रमाण दर दिवस कुठेतरी चोरी होत आहे. या भागातील नागरिकांना याचा फटका बसला आहे व बसत आहे. त्यामध्ये छोटी छोटी दुकाने फोडणे, दुकानात कोणी नसताना दुकानातील गल्ला चोरणे, घराच्या बाहेर लावलेल्या टू व्हीलर, थ्री व्हीलर फोर व्हीलर या गाड्यांमधून बॅटऱ्या चोरणे, नळाचे पाणी घरामध्ये घेण्यासाठी लावलेल्या विद्युत मोटारी चोरणे, गॅसचे सिलेंडर, सायकल, मोटरसायकल, पाळीव प्राण्यांमध्ये शेळ्या, लहान मुलांच्या गळ्यातील सोन्याची पान, हातातील उपायातील चांदीचे वाळे, बोकड,गाई,म्हशी,घराच्या बाहेर ठेवलेले गृह उपयोगी भांडे, स्टील, पितळ, जर्मल, बकेट हांडे, घागरी असे साहित्य चोरी सर्रासपणे दर दिवस होत आहे.भुरट्या चोऱ्यांचे सत्र सुरू असतानाच शहर पोलिसांना मात्र हे भुरटे चोर शोधूनही व माहिती देऊ नाही सापडत नाही. यामुळे परळी शहर पोलीस प्रशासनाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भुरट्या चोरांचा आणि पोलिसांचा जसं काही साठेलोटच आहे असंच चित्र सध्या तरी परळी शहरात दिसून येत आहे. परिसरातील चोरीचे सूत्र जर थांबले नाही तर या प्रकरणाचा सविस्तर अहवाल तयार करून जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावंद यांच्याकडे भुरट्या चोरांचा बंदोबस्त करावा याची मागणी करण्यात येणार आहे.

# ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप





**परप्रांतीय मजुरी करणारे व्यवसाय करणारे यांची १७ ते १८ मुले शाळेत आहेत. परंतु त्यांचे आधार कार्ड नियमित नसल्याने व जन्मदाखला उपस्थित नसल्याने त्यांची नाव नोंदणी करणे अशक्य आहे. त्यामुळे त्यांच्या प्रवेशाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या विद्यार्थ्यांना शासनाने प्रवेशित करावे असे ज्येष्ठ शिक्षक अजय लगड यांनी यावेळी सांगितले.**

**कोळगाव । महेश शिंदे**

कोळगाव येथील ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने दिनांक सात जुलै २०२५ रोजी प्राथमिक शाळा कोळगाव येथील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये वह्या, कंपास पेटी व पेन विद्यार्थ्यांना भेट देण्यात आले.

ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय जाधव सर, बाळकृष्ण गायकवाड, दादासाहेब घोंडगे, प्रकाश शिंदे, संभाजीराजे लगड, दादा शिरसाठ, आबासाहेब गाडेकर, महेशकुमार शिंदे यांनी प्राथमिक शाळा कोळगाव येथील इयत्ता पहिली ते चौथी मधील ६० च्या वर विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले त्यामध्ये एकेरी, दुरेघी व एकत्रित असणारी वही, कंपास पेटी व पेन असे वाटप करण्यात आले.

यावेळी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक तांबे सर, नंदू गायकवाड, अजय लगड, प्रवीण कवडे, अभिजीत दळवी, उज्वला भंडारे, संगीता नलगे, जयश्री लोटके हे शिक्षक वृंद उपस्थित होते.

## संपादकीय..

# भाषा संस्कार



मराठी भाषा कायम आपली सुसंस्कृत संस्कृती जपत आलीय. अलंकारी भाषा, प्राचीन संस्कृती याचे उदाहरण म्हणजे माझा महाराष्ट्र देश. भूक शमवणाऱ्या कांदाभाकरी प्रमाणे ताई, माई, आईच्या गोकुळात नांदणार घरकुल ज्याच्या भिंती मायेच्या स्पंदनाने भारलेल्या आहेत. स्वागताचे दरवाजे आलिंगन देण्यास सरसावलेले आहेत. मराठी भाषेचे बाळकडू प्यायलेले आम्ही, आमच्या नसानसांत मराठी भाषेचा जाज्वल्य अभिमान आहे. 'एका बीजापोटी फळे कोटी कोटी' या अर्थाने प्राचीन भाषा संतांच्या महत्प्रयासाने विकसित झाली. मौखिक आणि लिखित स्वरूपातली भाषा संवादाचे एक माध्यम बनली. परस्पर संबंध वृद्धिंगत करणे भाषेचे महत्त्वाचे कार्य असल्याने पिढीजात संस्काराचे महत्त्व अबाधित ठेवणारी भाषा ही संस्कृतीच्या रथचक्राचे सारथ्य करू लागली. नात्यामधली विविध चक्रं रथचक्राला जोडली जात असताना ज्ञानदान, कर्तव्य, नैतिकता, भावना यामध्ये भाषानिर्मितीची स्वप्न फलद्रुप होताना दिसू लागली.

जन्माबरोबर आलेली मातृभाषा त्यातील यमक, व्यंजन, उपमा, विशेषण यांचा श्री. गणेशा माझ्या घरापासूनचं झाला. भाषेसोबत संस्कारही उतरले माझ्या मनावर. खडूच्या कोऱ्या पाटीवरल्या रेघोट्या म्हणजे माझ्या आयुष्यातील भाषेचा पहिला वर्ग. आजी, पणजीच्या अंगाईतल्या जिजाबाई, रमाई, झासी यांच्या प्रेरणादायी कथांनी चिऊकाऊच्या गोष्टींनी, सणावाराचे महत्त्व, बडबडगीत यांनी झोपेवर घातलेले पांघरूण, गोधडीतली उब अजूनही जाणवते मला. माझा जन्म मूळचा गिरगावचा. आमची साखर झोप म्हणजे पहाटेस येणारा पाण्याचा नळ आणि वासुदेवाची स्वारी, जी आमची स्वतंत्र ऊर्जा होती. महिलावर्ग संस्काराच्या सततच्या पायवाटेवर भाषेचे रांजण भरताना, आमच्या बालमनावर शिक्कामोर्तब करत. नवचैतन्यरूपी सकाळी हरिपाठाचे अभंग, टाळांचा जयघोष पंढरपूरच्या वारीचा भास घडवे. एकात्मिक भाव घेऊन लहानाची मोठी होताना, अभ्यासापासून सुरू झालेला शब्दनाद आनंदे रंगू लागला होता. मुखोद्गत असलेली भजनं, श्रावणातील ग्रंथपारायण शब्दकळांचे उन्नयन करत होता. आजीसोबत मनाचे श्लोक, रामरक्षा तोंडपाठ झालेले. झाडू, वेणी, फणी करताना बाराखडीच्या मदतीने आईने शिकवलेला स्वयंपाक आज कामाला येतोय. कधीकधी मावशीची चमत्कारिक वाक्य ऐकताना हसू येई. संस्कृत भाषेत काहींचे संकेत असल्याने गमतीचे अनुभव येत. अशा या संपन्न मराठी भाषेचा वापर फार पूर्वी कमी शिकलेल्या स्त्रिया चतुराईने करत. म्हणजे, पी हळद हो गोरी, चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे, उंटावरून शेळ्या हाकणे, नाव मोठे लक्षण खोटे, पायातली वहाण पायी बरी. तेव्हा त्याचे अर्थ कळत नसत पण भाषेतली मार्मिकता उमगे. सतत कानावर पडणाऱ्या अभंग रचना, तालबद्ध वाजणारा तानपुरा, बासरीचे संस्कार माझ्या मेंदूत चपखल बसले होते. जात्यावरच्या दळणकांडात, बहिणाबाईंची ओवी गुंतणाऱ्या आईच्या मंजुळ शब्दांनी माझी भाषिक समृद्धता वाढत होती. आजूबाजूच्या इतर बोलीभाषांमुळे भाषांचा जंगी फड चाळीत ऐकायला मिळे. लग्न, हळदीच्या रूपाने गीताला पारंपरिक साज चढे. दिवाळी, दसरा या सारख्या कार्यक्रमातून निबंध स्पर्धा, एकपात्री प्रयोग, स्मरणशक्ती स्पर्धा या अन्वये भाषाविकास पालवीला उमाळे फुटत. पुढे वत्कृत्वाच्या जोरावर शाळा, कॉलेजमध्ये पुस्तक रूपाने, माझं भाषाज्ञान वाढत होते. मराठी कुटुंबात जन्मलेल्या माझ्यासारख्या अनेक मुली, मुलेअशा प्रकारच्या सरावाने, अभ्यासाने मोठ्या होत गेल्या. अंतर्भूत कलागुण दुसऱ्या पिढीकडे जाताना संस्कार फळाला येत होते. लावणी बाजाची ओळख नव्याने होत होती. सवाल–जवाब, ढोलकीची थाप सगळं अलौकिक होतं. या संस्कार प्रवाहात घरापासून दारापर्यंत संस्कृतीचे निशाण फडकत होते. परंपरेनुसार इथली संस्कृती भाषेचे दुसरे अंग बनली. भाषाप्रेम आणि जाज्वल्य अभिमानामुळे घराघरांत वसलेले छत्रपती शिवाजी महाराज तरुणांच्या हृदयावर गारूड घालू लागले. वारसाहक्काने साहित्यातली संस्कृती पुढच्या पिढीला जाऊन मिळत होती. आज मागे वळून पाहताना मराठी संस्कृतीची पायवाट प्रशस्त भासते. माझ्याचं पाऊलखुणांवर माझी छोटी पिल्लावळ, माझी नातवंड शोभून दिसतात. हा वारसा पुढे नेण्याचे बळ मिळू दे. कारण भाषा वाचली, ती बोलण्यात आली, तरचं तिची समृद्धी अभिजात राहील. ज्ञानदेव बाळ माझा सांगे गीता भगवंताच्या. प्राकृत भाषेतील गीता मराठीत आणण्याचा चमत्कार संत ज्ञानदेव करू शकतात.! तर मराठी भाषा प्रसारासाठी आपलंही योगदान तितकचं महत्त्वाचे आहे. आई आजीच्या गोष्टी माझ्यासाठी चिकार महत्त्वाच्या वाटतात. त्यांनी रूजवलेल्या संस्कारांमुळे आमच्या पिढीवर अनंत उपकाराचे ऋण आहे.

# उत्सव आणि अर्थसत्य




गेल्या आठवड्यात, भारतीय अर्थव्यवस्थेने जपानी अर्थव्यवस्थेला मागे टाकून एकूण जगात चौथ्या क्रमांकाचे स्थान पटकाविल्याचे विधान भारतीय नीती आयोगाकडून करण्यात आले. त्याच्या पुष्ट्यर्थ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या 'वर्ल्ड इकनॉमिक आउटलूक' या महत्त्वाच्या अहवालाचा संदर्भ देण्यात आला. या अहवालाचे काळजीपूर्वक वाचन केले असता हे लक्षात येते की, हे विधान अकालिक (ीशिर्रीीश) असून, २०२५–२६ या वित्तीय वर्षाच्या अखेरीस ही घटना घडण्याची एक शक्यता आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून वर्तविण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अंदाजाप्रमाणे २०२५–२६ या वित्तीय वर्षाच्या अखेरीस, भारत व जपान या देशांच्या अर्थव्यवस्थांचे आकारमान हे चार लाख कोटी अमेरिकी डॉलर इतके होऊ शकते. तेव्हा सर्वप्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की 'अर्थव्यवस्था चार लाख कोटी अमेरिकी डॉलर इतकी होऊ शकते' या वाक्याचा 'ती अगोदरच तेवढी बनली आहे' असा विपर्यास केला गेला आहे, जे योग्य नव्हे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट ही आहे की, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ही संस्था निरनिराळ्या देशांचा डेटा स्वत: गोळा करत नाही. ही संस्था आपले अंदाज वर्तविण्यासाठी, निरनिराळ्या देशांच्या अधिकृतपणे जाहीर झालेल्या सरकारी डेटाचा वापर करते. गेल्या काही वर्षांत, म्हणजेच २०१६–१७ या वर्षांपासून भारतीय अर्थव्यवस्थेला अनेक हादरे बसलेले आहेत. अचानकपणे लादलेली नोटाबंदी, पुरेश्या तयारीशिवाय सुरू झालेली 'जीएसटी'ची करप्रणाली (जी आता स्थिरावली आहे), वित्तीय कंपन्यांवर आलेले अरिष्ट व करोना ही त्या हादऱ्यांची उदाहरणे. यांचा सर्वाधिक फटका भारताच्या अनौपचारिक (इनफॉर्मल) क्षेत्राला बसला आहे. मात्र यामुळे या क्षेत्राचे जे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे त्याचे 'मापन' योग्य प्रकारे झालेले नाही, ही भारतीय डेटाविषयीची गंभीर तक्रार आहे. याचे परिणामकारक उदाहरण द्यायचे झाले तर भारतातील बेरोजगारीचे वाढते प्रमाण. जर आपली अर्थव्यवस्था प्रतिवर्षी सात ते आठ टक्क्यांनी वाढत असेल तर रोजगारनिर्मिती देखील त्याला सुसंगत असायला हवी; पण तसे होत नाही आहे. याचे कारण 'रोजगारनिर्मितीत' अग्रेसर असणाऱ्या अनौपचारिक क्षेत्राची निरोगी पद्धतीने वाढ होत नाही आहे.

शिवाय अधिकृतपणे सन २०२४–२५ साठीचा जो डेटा बाहेर आला आहे तो अजून तात्पुरत्या स्वरूपाचा (प्रोव्हिजनल) असल्यामुळे त्यात अनेक बदल होत, अंतिम डेटा बाहेर यायला २०२७ हे वर्ष उजाडेल. यामुळेच या डेटावर आधारित जी भाकिते आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने केली आहेत, त्यांच्या विश्वासार्हतेबद्दलही प्रश्न निर्माण होतो. तसेच २०२५–२६ या चालू वित्तीय वर्षातील जेमतेम दोन महिने संपले आहेत. त्यात जगात सुरू असलेल्या जकात–युद्धामुळे निर्माण झालेली प्रचंड अनिश्चितता, त्याचा भारतीय निर्यातीस व पर्यायाने उत्पादनक्षेत्रास बसणारा फटका, हवामान–बदलाचे दुष्परिणाम, वाढलेली बेरोजगारी व मंदावलेली मागणी हे घटक लक्षात घेतले तर २०२५–२६मध्ये भारतीय आर्थिक वाढीचा दर अनेकांच्या अपेक्षेपेक्षा कमीच असण्याची शक्यता आहे.

तरीही धरून चालू या की, अगदी येणाऱ्या वर्षात नाही तरी पुढील काही वर्षांत भारतीय अर्थव्यवस्थेचे जीडीपी, जपानच्या जीडीपीहून अधिक असेल. पण मग ही उत्सव साजरा करण्याची परिस्थिती मानायची का? आजमितीला जपानची लोकसंख्या १२.३ कोटी असून, जपानचे दरडोई उत्पन्न ३३,९०० अमेरिकी डॉलर इतके आहे. तर भारताची लोकसंख्या १४६ कोटी असून, भारताचे दरडोई उत्पन्न फक्त २,८८० अमेरिकी डॉलर एवढेच आहे. जेव्हा चीनची अर्थव्यवस्था चार लाख कोटी अमेरिकी डॉलर इतकी झाली होती तेव्हा चीनचे दरडोई उत्पन्न ३,५५० अमेरिकी डॉलर इतके होते आणि फक्त दहा वर्षांत, आज ते १३,००० अमेरिकी डॉलर इतके वाढले आहे. आज भारत व चीन हे दोन्ही देश जरी जागतिक पातळीवर मध्यम उत्पन्न गटांत मोडत असले, तरी भारताचे दरडोई उत्पन्न, मध्यम उत्पन्न गटाच्या, सर्वांत खालच्या स्तरावर अडकलेले आहे.तसेच भारतीय अर्थव्यवस्थेतील पराकोटीची विषमता लक्षात घेतली तर 'दरडोई उत्पन्न' या 'सरासरी'ला काहीच अर्थ उरत नाही. सन २०२२मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'वर्ल्ड इनइक्वालिटी रिपोर्ट'नुसार भारतीय लोकसंख्येतील ऊर्ध्व एक टक्का लोकांच्या हातांत देशाच्या एकूण मत्तेतील ४० टक्के मत्ता एकवटली आहे; तर तळाच्या ५० टक्के लोकांच्या हातांत फक्त तीन टक्के मत्ता आहे. उत्पन्नाच्या संदर्भात बोलायचे झाले तर देशाचे ५७ टक्के उत्पन्न फक्त १० टक्के लोक कमावत आहेत. हे असे का व्हावे? तर जी क्षेत्रे आज देशाच्या आर्थिक वाढीसाठी महत्त्वाचे योगदान करत आहेत (उदा., माहिती तंत्रज्ञान, वित्त, इ–कॉमर्स, रिअल इस्टेट, मोठे उद्योग वगैरे), ती रोजगारनिर्मितीत मागे पडली आहेत. कामगारवर्गातील ५० टक्के लोक कृषी क्षेत्रात आहेत, ज्याचा जीडीपीतील हिस्सा जेमतेम १७–१८ टक्के आहे. ज्या अनौपचारिक क्षेत्रामधून सर्वाधिक रोजगार निर्माण होतो, ते क्षेत्र सतत वेगवेगळ्या अरिष्टांचे शिकार होत असते. मात्र त्या क्षेत्रातील कामगारांसाठी कुठलीही सामाजिक सुरक्षा–व्यवस्था अस्तित्वात नाही. वस्तुनिर्माण (मॅन्युफॅक्चरिंग) क्षेत्राचा (जे रोजगार–निर्मितीसाठी महत्त्वाचे असते), भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रभाव कमी होतो आहे. या क्षेत्राचा जीडीपीमधील हिस्सा २००७–०८ मध्ये १७ टक्के होता, तो आज १३ टक्के इतका कमी झाला आहे.गेल्या काही वर्षांत, सरकारी क्षेत्र सातत्याने पायाभूत सुविधा, उद्योग यांतील गुंतवणूक वाढवत असले तरी खासगी क्षेत्राचा गुंतवणुकीचा दर कमीच होतो आहे. मुख्य म्हणजे भारतीय उद्योजकांचा देशांतर्गत प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्याचा उत्साह आटला असून, ते देशाबाहेर गुंतवणूक वाढवत आहेत. गेल्या काही वर्षांत, डॉ. रेड्डीज लॅबरोटरीज, झायडस लाइफसायन्सेस, सन फार्मा, इंफोसिस, एचसीएल टेक, विप्रो, एअरटेल, टाटा स्टील, टाटा ॲग्रटार्स, सोना, एचईजी, पीआय इंडस्ट्रीज अशा अनेक कंपन्यांनी देशाबाहेर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढविली आहे. यामागे देशांतर्गत धोरणांमधील अनिश्चितता, उद्योग करण्यास आवश्यक असलेल्या सुलभतेचा अभाव (लाल फीतशाही), अपुऱ्या आर्थिक सुधारणा आदी कारणे संभवू शकतात. स्वातंत्र्योत्तर काळातील सुरुवातीच्या दशकांतील 'आयात पर्यायन' (इम्पोर्ट सबस्टिट्यूशन) व गेल्या दशकातील 'आत्मनिर्भरता' या धोरणांमुळे अनेक भारतीय उद्योग आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी पुरेसे तयार झालेले नाहीत. भारतीय उद्योगांचा 'संशोधन व विकास' (रीसर्च अँड डेव्हलपमेंट) यावरील खर्च तसेच 'नवप्रवर्तना'मधील कामे (इनोव्हेशन्स) अतिशय नगण्य राहिली आहेत.भारतीय उद्योजकांच्या मुलाखती वाचल्या तर हे समजते की, कुशल कामगारांचा अभाव, प्रतिबंधात्मक नियमन, आणि 'संशोधन, धोका पत्करण्याची प्रवृत्ती व नवप्रवर्तन' यांना अनुकूल अशा संस्कृतीचा अभाव, हे त्यांना सातत्याने डाचणारे मुद्दे आहेत. ज्या देशातील वस्तुनिर्माण क्षेत्र आक्रसत चालले आहे, त्या देशातील बेरोजगारी वाढणे, सर्वसामान्यांसाठीचे उत्पन्नाचे ओघ आटणे व विषमता वाढणे यात नवल ते काय! आज भारताचे आर्थिकदृष्ट्या उत्तम चालले आहे, असे मुख्यत्वे आपल्या देशातील ऊर्ध्व एक टक्का लोकांना वाटते. येणाऱ्या काही वर्षांत, एकूण आकारमानात जरी भारतीय अर्थव्यवस्था प्रथम जपानच्या व नंतर जर्मनीच्या पुढे गेली तरीही जोपर्यंत इथे समतोल आर्थिक वृद्धी (बॅलन्स्ड इकनॉमिक ग्रोथ) होत नाही, तोपर्यंत भारतात अशा उपलब्धीचा सर्वव्यापी आनंद दिसून येणार नाही. जोसेफ स्टिगलित्झ या अर्थशास्त्रज्ञाच्या म्हणण्यानुसार, 'विकास म्हणजे अर्थव्यवस्थेचे परिवर्तन नव्हे; तर सर्वसामान्यांच्या आयुष्यातील परिवर्तन'. हे परिवर्तन घडवून आणण्यासाठी आपली आर्थिक धोरणे अनुकूल आहेत का हे सतत तपासत राहिले पाहिजे.

# पारदर्शक कारभार कुठे आहे?



वनशक्ती संस्थेने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने निकाल देत केंद्र सरकारला पूर्वलक्षी पर्यावरणीय मंजुरी देण्यास मनाई केली आहे. आता कोणताही प्रकल्प सुरू करण्यापूर्वीच पर्यावरणीय मंजुरी घ्यावी लागेल. यामुळे मागील दाराने पर्यावरणावर घाला घालणारे प्रकल्प राबवता येणार नाहीत. पर्यावरण रक्षणासाठी हे मोठे पाऊल आहे.

आपल्या देशाला जगातील जवळजवळ सर्व परिसंस्थांचे वरदान लाभले आहे. आपण भारतीय म्हणून, भावी पिढ्यांसाठी पर्यावरण सुसंवर्धित ठेवणे ही आपली उपजत जबाबदारी आहे. कारण भावी पिढ्यांचाही निरोगी आणि सुरक्षित पर्यावरणावर समान अधिकार आहे, हे आपण कधीही विसरू नये. भारताच्या नैसर्गिक संपत्तीचे महत्त्व आपल्या संविधान निर्मात्यांना आणि देशाच्या नेत्यांना समजले होते. आपल्याला राज्यघटनेचा मोठा आधार मिळाला आहे, जो आपल्या हक्कांसोबतच आपली कर्तव्येही स्पष्ट करतो.

भारतीय घटनेतील भाग चार–अ मधील अनुच्छेद ५१–अ स्पष्टपणे सांगतो की, निसर्गाचे, पर्यावरणाचे जतन व संवर्धन करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकांचे मूलभूत कर्तव्य आहे. यामध्ये जंगल, नद्या, सरोवरे, वन्यजीव यांचे संरक्षण करणे अपेक्षित आहे. अनुच्छेद २१ अंतर्गत 'जीवनाचा अधिकार' म्हणजे प्रत्येक नागरिकाला प्रदूषणमुक्त, निरोगी वातावरणात जगण्याचा अधिकार आहे.

भारतात १९७० ते १९८० दरम्यान झपाट्याने औद्योगिकीकरण झाले. यामुळे जंगलांची तोड झाली, नद्या प्रदूषित झाल्या आणि नागरिकांच्या जीवनावर वाईट परिणाम झाला. खाणकाम, थर्मल पॉवर प्लांट्स, रिफायनरीज, बांधकाम – हे सर्व विकासाच्या नावाखाली पर्यावरणाच्या किमतीवर सुरू झाले. म्हणूनच १९८६मध्ये पर्यावरण संरक्षण कायदा (ईपीए) लागू करण्यात आला, मात्र या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही.

पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अधिसूचना (ईआयए नोटिफिकेशन) २००६मध्ये जारी करण्यात आली. यामागचा उद्देश म्हणजे एखाद्या प्रकल्पामुळे होणारे पर्यावरणीय नुकसान आधीच समजून घेऊन त्यासाठी योग्य उपाययोजना करणं. यामध्ये काही संवेदनशील भाग कायमस्वरूपी संरक्षित राहावेत, असेही नमूद केले होते. त्यामुळे बेबंदपणे होत असलेल्या पर्यावरणाच्या हानीला आळा बसला. शाश्वत विकासाचा सिद्धांत पाळला जावा, यासाठी प्रक्रिया ठरवण्यात आल्या. उद्योगांचे वर्गीकरण पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांच्या आधारे करण्यात आले. मात्र 'विकासासाठी पर्यावरणाचा नाश आवश्यक आहे आणि जंगल, नद्या या जीवनदायी गोष्टी विकासात अडथळा आहेत,' असे मानणाऱ्यांना मात्र हे निर्णय मानवले नाहीत.

२०१४ पूर्वीची सत्ताधारी व्यवस्था कायदे कमकुवत करण्याचा प्रयत्न करत होती. मध्यवर्ती राज्यव्यवस्था स्पष्टपणे संविधानाविरुद्ध पावले उचलत नव्हती, परंतु, पर्यावरण संरक्षणाच्या निर्णयांना सतत विलंब करत होती. १५ वर्षांपासून माधव गाडगीळ अहवालावर निर्णय लांबवत ठेवणे हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. पण नंतर आलेले कोणतेही सरकार याला अपवाद नाही, सर्वच पक्ष संविधानिक जबाबदाऱ्या पाळण्यात अपयशी ठरले.२०१७ मध्ये केंद्र सरकारने एक अधिसूचना काढली. ज्यात मागील सर्व पर्यावरणीय नियमबाह्य प्रकल्पांना कायदेशीर मान्यता देण्याची मुभा देण्यात आली. १४ मार्च २०१७ पासून ६ महिन्यांसाठी ही सूट दिली गेली आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना हजारोंना याचा फायदा मिळाला. ही सवलत मर्यादा संपल्यावरदेखील उल्लंघन होतच राहिले.

राष्ट्रीय हरित लवादाने २०२१मध्ये सरकारला सांगितले की, त्यांनी पर्यावरण उल्लंघनाच्या प्रकरणांवर कार्यप्रणाली एसओपी तयार करावी. यानंतर केंद्र सरकारने पुन्हा एक अधिसूचना काढून उल्लंघन करणाऱ्यांना सूट देण्याची प्रक्रिया स्पष्ट केली.

ही सर्व सवलत आणि वागणूक पूर्णतः असंवैधानिक आणि बेकायदा होती. याविरोधात 'वनशक्ती'ने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. आम्ही न्यायालयात मुद्दा मांडला, जर एखादा तलाव बुजवून त्यावर इमारत बांधली गेली, तर किती दंड भरून तो पुन्हा मूळ स्वरूपात आणता येईल? किती पैसे भरून एक डोंगर आणि त्यावरचं जंगल पुन्हा जिवंत करता येईल? हानी कायमस्वरूपी आहे आणि पैशांद्वारे तिची भरपाई होऊ शकत नाही.गंगेच्या स्वच्छतेवर हजारो कोटी रुपये खर्च करूनही नदी शुद्ध झाली आहे का? गोवा व सिंधुदुर्गातील नदी–जंगलांना खाणकामाने कायमस्वरूपी हानी पोहोचवली. किती लोकांना शिक्षा झाली आहे? पर्यावरणाच्या गुन्ह्यांबाबत खटले चालू राहतात आणि दोषी मोकळेच राहतात.म्हणूनच 'पूर्वसावधतेचा सिद्धांत' लागू केला पाहिजे. २००६च्या अधिसूचनेत ३४ वेळा नमूद आहे की प्रकल्प सुरू करण्यापूर्वी पर्यावरण परवानगी घेणे बंधनकारक आहे. मग असे असताना केंद्र सरकारने उल्लंघन करणाऱ्यांना प्रोत्साहन देणारी अधिसूचना का आणली?न्यायालयाने सुनावणीदरम्यान महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले, 'हे उल्लंघन करणारे गरीब, अशिक्षित नव्हते, तर साक्षर, राजकीयदृष्ट्या शक्तिशाली, श्रीमंत होते, जे कायद्याचा अपमान करून 'विकासाच्या' नावाखाली पर्यावरणाचा नाश करत होते. सरकारनेही यांना पाठबळ दिलं.'शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक प्रकल्प यांना सूट द्यावी, असा युक्तिवाद सरकारने केला. पण इमारतींचा परिणाम एकच असतो – ती शाळा असो वा निवासी संकुल! हैदराबाद विद्यापीठ प्रकरणातून आपल्याला दिसलेच आहे की 'विकासाच्या' नावाखाली जंगलांचा नाश कसा होतो. नैसर्गिक परिसंस्था ही कुठल्याही पैशांत मोजता येणार नाही अशी अमूल्य संपत्ती आहे. मग निसर्गाचा विनाश करणाऱ्या दोषींना मोकळं का सोडलं जातं?पर्यावरणाचा ऱ्हास हा मानवी जीवन, समाज आणि आरोग्यावर गंभीर परिणाम घडवतो. शाश्वत विकास म्हणजे सगळ्या समाज घटकांसाठी समृद्धी निर्माण करणं, पण त्याच वेळी नैसर्गिक परिसंस्थांचे जतन करणंही तितकेच महत्त्वाचे आहे. हे होत नसेल तर कोणतेही काम म्हणजे फक्त विनाश आहे, विकास नव्हे!

कायद्यात अशा प्रकारची सवलत देणे म्हणजे त्याला अर्थहीन बनवणे. देशाच्या पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सर्वांची भिस्त न्यायव्यवस्थेवर आहे. न्यायव्यवस्था आपली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडेल याची खात्री आहे. सरकारनेही आपली कर्तव्ये पार पाडली पाहिजेत, ती निसर्गाचा नाश करण्यासाठी नव्हे तर त्याचे रक्षण करण्यासाठी असायला हवीत. देशाचे पर्यावरण ही श्रीमंत वर्गासाठी, विनाशासाठी मोकळी ठेवलेली गोष्ट नाही, ती आपल्या सर्वांची आहे आणि म्हणूनच तिचे संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

# कोंबडं घ्या, पण जलजीवनचे पाणी द्या आष्टीत मनसेचे अनोखे आंदोलन

**कडा (प्रतिनिधी)**–आष्टी तालुक्यात जलजीवन मिशनमार्फत नळयोजनांची सुरू असलेली कामे गेल्या चार वर्षांपासून अर्धवट अवस्थेत असून कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च होऊनही नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. जलजीवनची अर्धवट कामे पूर्ण करून नागरिकांना पाणी मिळावे याकडे लक्ष वेधण्यासाठी मनसे शेतकरी सेनेचे कैलास दरेकर यांनी सोमवारी (दि. ७) पंचायत समिती कार्यालयात 'कोंबडं घ्या, पण जलजीवनचे पाणी द्या' हे अनोखे आंदोलन करण्यात आले.जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर जल' ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महात्वाकांक्षी योजना आहे. आष्टी मतदारसंघातील आष्टी, पाटोदा व शिरूर कासार या तीन तालुक्यांतील गावांना कोट्यावधी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सततच्या दुष्काळी परिस्थितीने होरपळणार्या जनतेला विशेष करून महिला व वयोवृद्ध नागरिकांना या योजनेचा मोठा फायदा होणार असून भारत निर्माण योजना, स्वजलधारा योजना, जलस्वराज्य, राष्ट्रीय पेयजल योजना, मुख्यमंत्री पेयजल, योजना, प्रधानमंत्री पेयजल योजना यासारख्या विविध योजनांवर शेकडो कोटींचा निधी खर्च होऊनही अधिकारी व कंत्राटदारांच्या संगनमताने निकृष्ट कामांमुळे वर्षानुवर्षे डोक्यावर असलेला हंडा उतरण्यास तयार नाही. जलजीवन मिशन योजनेअंतर्गत आष्टी तालुक्यातील १७२ गावे, पाटोदा तालुक्यातील ९० गावे व शिरूर तालुक्यातीलही अनेक गावांत ही योजना राबविण्यासाठी निविदा प्रक्रिया पार पडून प्रत्यक्ष कामांना सुरवातही धुमधडाक्यात करण्यात आली आहे. मात्र, कंत्राटदार व अधिकार्यांच्या अभद्र युतीमुळे इतर राबविण्यात आलेल्या योजनांप्रमाणे या योजनेतही मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार करण्यात आले असून गेल्या चार वर्षांपासून जवळपास सर्वच योजना अर्धवट अवस्थेत ठेवून मागील योजनांप्रमाणे या योजनेतही भ्रष्टाचार करण्याचे मनसुबे कंत्राटदार व अधिकार्यांकडून बाळगले जात आहेत. आष्टी तालुक्यातील १७२ पैकी ४४ कामे तसेच पाटोदा तालुक्यातील ९० पैकी २७ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली व पाटोदा तालुक्यातील ५ कामांची यशस्वी चाचणी घेण्यात आली असल्याचे दाखविण्यात आले




आहे. मात्र, अद्यापपावेतो कोणत्याही गावाला या योजनेमार्फत पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला नसल्याने ग्रामस्थांसाठी कोट्यावधी रूपयांची ही जलजीवन योजना मृगजळच ठरली असल्याचे दिसून येत आहे.कार्यारंभ आदेशानंतर चार वर्षांचा कालावधी लोटूनही अद्याप या योजनेमार्फत सुरू असलेली कामे पूर्णत्वास गेलेली नसून मुदतवाढीचे प्रस्ताव थातूरमातूर कारणे दाखवून मोठ्या आर्थिक उलाढालीतून मंजूर करण्यात आलेले आहेत अथवा तशा हालचाली सुरू आहेत. आष्टी मतदारसंघातील सर्वच कामांमध्ये निविदा प्रकिया राबविण्यापासून मोठ्या प्रमाणावर गोलमाल करण्यात आलेला आहे. एकाच कंत्राटदारांना २० ते २५ कामे देण्याचा महाप्रताप करण्यात आलेला आहे. अद्यापपावेतो ही योजनाही कागदोपत्रीच सुरू असून याचा नागरिकांना कोणताही लाभ झालेला नाही. त्यामुळे कार्यारंभ आदेशामध्ये कंत्राटदारांना घालून देण्यात आलेल्या अटी व शर्तीप्रमाणे कंत्राटदारांवर १० टक्के दंडात्मक कारवाई करण्यात येणे गरजेचे व आवश्यक आहे.

कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करून त्यांना सहाय्य करणार्या अधिकार्यांवरही फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करावेत. यासह आष्टी तालुक्यातील जनतेला तातडीने जलजीवन योजनेचे पाणी नळाद्वारे मिळावे यासाठी सोमवारी (दि. ७) अनोखे आंदोलन करण्यात आले.

**पोतराजाच्या वेश; अन सुबुळ्याने वेधले लक्ष**

दरम्यान, जलजीवन योजनेत आष्टी मतदारसंघात झालेल्या गैरप्रकारांकडे लक्ष वेधण्यासाठी कैलास दरेकर यांनी पोतराजाचा वेश परिधान करून आष्टी शहरातून हलगी, संबुळं व ताशाच्या गजरात सवाद्य मिरवणूक काढत पंचायत समितीमध्ये जावून अधिका–यांना आखाड महिन्यातील कोंबड्यांची भेट दिली. या आंदोलनाची चर्चा दिवसभर सुरू होती.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते एकात्मिक सनियंत्रण कक्ष व 'हरित वारी' पचे उद्घाटन

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक भवनाचेही भूमिपूज

**पंढरपूर (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्यावतीने पंढरपूर आषाढी वारीच्या संनियंत्रणासाठी शहर पोलीस ठाण्याच्या मागे स्थापन करण्यात आलेला एकात्मिक सनियंत्रण कक्ष, हरित वारीच्या उपक्रमांतर्गत तयार करण्यात आलेल्या 'हरित वारी' पचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, गृह राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार गोपीचंद पडळकर, समाधान आवताडे, डॉ. बाबासाहेब देशमुख, अभिजित पाटील, सचिन कल्याणशेट्टी, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, देवस्थान समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आदी उपस्थित होते.




आषाढी वारी मार्ग, नदी पात्र, वाळवंट, वाखरी पालखी तळ, ६५ एकर परिसर, पत्रा शेड, प्रदक्षिणा मार्ग, मंदिर परिसर या ठिकाणी ड्रोन कॅमेरे तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून अहोरात्र गर्दीचे संनियंत्रण केले जात आहे. कोठे काही घटना घडल्यास तत्काळ नियंत्रण कक्षातील स्क्रीनवर दिसत असल्याने त्या ठिकाणी गतीने पोहोचून स्थिती नियंत्रणात आणता येत आहे असे, पोलीस अधीक्षक श्री. कुलकर्णी यांनी सांगितले.या एकात्मिक सनियंत्रण कक्षाद्वारे प्राप्त चित्रीकरणाच्या विश्लेषणातून आषाढी वारीसाठी कालपर्यंत पंढरपूर शहरात सुमारे १४ लाख वारकरी दाखल झाल्याचा अंदाज असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्यावतीने कम्युनिटी पोलिसिंग अंतर्गत 'हरित वारी' हा उपक्रम राबविण्यात येत असून त्याच्या संनियंत्रणासाठी तयार करण्यात आलेल्या 'हरित वारी' पचे उद्घाटनही यावेळी करण्यात आले.'हरित वारी' उपक्रमांतर्गत सुमारे दीड लाखावर वृक्षांची लागवड सोलापूर ग्रामीण हद्दीत विविध ठिकाणी करण्यात येणार आहे. प्रत्येक झाडाला स्वतंत्र क्यूआर कोड दिला जाणार आहे. ह्या क्यूआरच्या माध्यमातून प्रत्येक झाडाची जात, त्या झाडाचे जिओ लोकेशन आणि त्याच्या सद्यस्थितीबाबत माहिती उपलब्ध असणार आहे. पचा वापर करण्याचे प्रशिक्षण ठाणे अंमलदारांना देण्यात आले आहे. हे प ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित असल्याने वृक्षारोपण मोहिमेतील विश्वासार्हता, पारदर्शकता आणि डिजिटल ट्रॅकिंग शक्य होणार आहे, असे यावेळी श्री. कुलकर्णी यांनी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्यावतीने विठ्ठल रुख्मिणी देवस्थान समितीला भक्तांच्या सेवेसाठी इलेक्ट्रिक वाहन प्रदान करण्यात आले. यावेळी बँकेचे प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष विद्याधर अनास्कार, मुख्य सरव्यवस्थापक डॉ. अशोक माने, देवस्थान समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक भवनाचे स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, अभिजित पाटील, गोपीचंद पडळकर, सचिन कलशेट्टी, डॉ.बाबासाहेब देशमुख, माजी आमदार प्रशांत परिचारक, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे आदी उपस्थित होते.

# सुधारित पीकविमा योजनेचा लाभ घ्यावा–प्रकाश वाघमारे

**बीड (प्रतिनिधी)**–राज्य शासनाने खरीप हंगाम २०२५ साठी पंतप्रधान पिक विमा योजना (पीएमएफबीवाय) राबविण्याचा निर्णय घेतला असून, शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री.सुभाष साळवे साहेब गेवराई तालुका कृषी अधिकारी श्री.

वीरकर साहेब यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक कृषी अधिकारी श्री.प्रकाश वाघमारे यांनी शिरसदेवी, काजळ्याचीवाडी

ठाकर आडगाव येथील शेतकऱ्यांची संवाद साधताना आव्हान केले आहे.या योजनेंतर्गत १ जुलैपासून विमा अर्ज व हप्ता भरण्याची प्रक्रिया सुरू झाली – असून, शेवटची तारीख ३१ जुलै २०२५ आहे. शेतकऱ्यांना यापूर्वी कपाशी, सोयाबीन,तूर, मूग, सर्व पिकांसाठी १रू मधे विमा योजना लागू होती, मात्र ती योजना आता रद्द करण्यात आली असून निश्चित हप्त्याची अंमलबजावणी सुरू आहे. विमा भरताना शेतकऱ्यांना आपला फार्मर आयडी तयार करणे बंधनकारक आहे.फार्मर तो नसल्यास संबंधित कृषी कार्यालयाशी संपर्क साधून तात्काळ तयार करावा,असे आवाहनही करण्यात आले आहे.तसेच ई–पिक पाहणी ही प्रक्रिया मोबाईल ॲपद्वारे पूर्ण करणे अनिवार्य आहे.विमा दाव्यासाठी ई–पिक पाहणीचा पुरावा आवश्यक

आहे.तसेच शेतकरी यांनी जे पीक आपल्या शेतात पेरले आहे त्याच पिकाचा पीक विमा उतरावा असे सांगितले दरम्यान, शासनाच्या सुधारीत



धोरणामुळे निश्चित हप्ता आकारला जात असल्याने अनेक शेतकऱ्यांनी यावर नाराजी व्यक्त केली आहे.विमा कंपन्यांना याचा अधिक फायदा होत असून, प्रत्यक्ष शेतकऱ्यांना कमी संरक्षण व अधिक आर्थिक भार सहन करावा लागत असल्याचे अनेक शेतकरी यांचे म्हणणे आहे.त्यामुळे या योजनेच्या अटी व शर्तीवर पुनर्विचार करण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे.शेतकऱ्यांनी वेळेत अर्ज करून आपल्या पिकांचे विमा संरक्षण पूर्ण करावे,असे आवाहन

सहायक कृषी अधिकारी श्री.प्रकाश वाघमारे यांनी केले आहे.

# जिजाऊ विद्यालयात विद्यार्थी–वारकरी दिंडी

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**:–शहरातील जिजाऊ विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त विविध संस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध संत, वारकरी, विठ्ठल–रुक्मिणी यांच्या वेशभूषा परिधान करून वारकरी दिंडीचे आयोजन केले.

परिसरातील जागृती हनुमान मंदिर या ठिकाणी विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण केले. परिसरातील नागरिकांनी या विद्यार्थी वारकरी दिंडीचे जागोजागी स्वागत केले. शालेय अभ्यासाबरोबरच आपला सांस्कृतिक वारसा जोपासण्याचे काम शाळेच्या माध्यमातून नेहमीच केले जाते च्या बद्दल जिजाऊ शाळेच्या कार्याचे नागरिकांनी कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका मोहिनी



जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मनीषा शिंदे, रंजना माळी, अनुराधा काळे, ईश्वरी शिंदे, अंजली सिरसाठ, सुषमा मगर, प्रिती बिडवे,अनुराधा पांचाळ यांनी परिश्रम घेतले.

# सागर इंग्लिश स्कूल संकुलात विठ्ठल नामाची शाळा

**मादळमोही (प्रतिनिधी)**–महाराष्ट्र ही एक संतांची भूमी म्हणून ओळखली जाते, ज्ञानोबा तुकोबांच्या जयघोषाने दुमदुमलेल्या सिरसदेवी मधील पवित्र भूमीतील आज दि. ५ जुलै रोजी शैक्षणिक क्षेत्रामध्ये अग्रेसर असलेले गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथील सागर इंग्लिश स्कूल अँड जुनिअर कॉलेज,येथील सर्व शिक्षक व विद्यार्थी यांनी एकत्र येत आषाढी एकादशीचे औचित्य साधून दिंडी सोहळा पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांनी नयनरम्य रिंगण करून पारंपरिक वेशभूषा परिधान करून दिंडी सोहळ्यात मोठ्या उत्साहात सहभागी झाले. हरिनामाचा गजर करत टाळ, मृदंगाच्या तालावर ठेका धरत विठ्ठल नामाचा' जयघोष करत दिंडीने सागर



शैक्षणिक संकुलाच्या प्रारंगणात पार पडला.

यावेळी विद्यार्थी, शिक्षक यांनी फुगडीचा खेळून आनंद घेतला. सागर इंग्लिश स्कूल मधील चिमुकल्यांनी विठ्ठल–रखुमाई चे वेशभूषा परिधान करून आलेले विद्यार्थ्यांचे ,पालकांचे प्रमुख आकर्षण ठरले. विद्यार्थ्यांनी पालखी तयार करून त्यामध्ये प्रत्यक्ष पंढरपुरातील विठू माऊली चे दर्शन घडवले.

यावेळी सागर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष श्रीमंत सानप सर व सचिव संतोष पटाईत सर तथा प्राचार्या सौ. पी एम सरिता मिस यांनी विठुरायाच्या चरणी प्रार्थना करत राज्यात समाधानकारक पाऊस पडून शेतकरी बांधव सुखी होवोत, दुष्काळ दूर जावो, अशी भावना व्यक्त केली.या कार्यक्रमासाठी आबुज मिस, शरीना मिस, शेटे मिस, अस्मिता मिस, ज्योती मिस, अंजुम मिस, अर्चना मिस, कदम सर, रहीम सर आदी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख मंगल आबुज व प्राचार्या सरिता मिस यांनी शिक्षकांच्या मेहनती बद्दल कौतुक केले. तसेच त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आ.सोळंके यांच्यामुळेच साळींबा उपसा सिंचन योजनेस मूर्त रुप–शेषेराव जगताप

**वडवणी (प्रतिनिधी)**–बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील काही भाग कायम दुष्काळी व आवर्षण प्रवण क्षेत्र आहे. त्यामुळे बारमाही कोरडवाहू असलेली शेती ओलिताखाली आणण्यासाठी साळींबा उपसासिंचन योजना ही सदर भागातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असून शेतकऱ्यांच्या पाण्याच्या गरजा भागविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. हीच गरज लक्षात घेता मागील एक वर्षापासून या भागाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी हा प्रश्न शासन दरबारी लावून धरलेला होता. त्यांच्याच पाठपुराव्यातून व परिश्रमातून ही योजना मंजूर झाली असून आता मार्गीही लागत आहे. केवळ त्यांच्यामुळेच या योजनेस मूर्त स्वरुप आले असून ओमप्रकाश शेटे हे कोणत्या आधारावर या योजनेचे श्रेय घेत आहेत हे समजणे अकल्पनीय आहे. त्यामुळे त्यांचा यातील सहभाग म्हणजे बेगानी शादीमें अब्दुल्ला दिवाना असेच आहे. ओमप्रकाश शेटे यांनी जनतेची अजिबात दिशाभूल करु नये, नसता त्यांच्या खोटारडेपणा विरोधात जन आंदोलन करण्यात येईल असे स्पष्ट मत वडवणी नगरपंचायतीचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी व्यक्त केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये नवी क्रांती घडवून आणणारा आणखी एक प्रकल्प शासनाकडून मंजूर झाला असून साळींबा ठिबक उपसा सिंचन योजना ही उर्ध्व कुंडलिका प्रकल्पाच्या धर्तीवर वडवणी तालुक्यासाठी नंदनवन ठरणार आहे. साधारणतः एक वर्षांपूर्वी माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी वडवणी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहामध्ये एक महत्त्वपूर्ण पत्रकार परिषद घेत त्या ठिकाणीच त्यांनी या योजने विषयीची सविस्तर अशी माहिती व मांडणी उपस्थित पत्रकारांना देवून सर्व जनतेपर्यंत याची माहिती पोहोचविली होती. तसेच या कामी त्यांचा शासनाकडे असलेला पाठपुरावा तो देखील त्यांनी सांगितलेला होता. माजलगांव धरणाच्या जलाशयामधून ठिबक सिंचनासाठी अनुज्ञेय होणाऱ्या पाण्यापैकी जायकवाडी प्रकल्प टप्पा २ या प्रकल्पाचा भाग म्हणून साळींबा ठिबक उपसासिंचन योजनेस १९.८१ [illegible]प्री. एवढा पाणीवापर अनुज्ञेय होण्यास विशेष बाब म्हणून शासकीय खर्चातून उपसा सिंचन योजना हाती घेण्यासाठी आता अंतीम मान्यता शासनाकडून देण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून तालुक्यातील देवडी येथील १०५७.१५ हेक्टर, पिंपरखेड



येथील ११०४.४९ हेक्टर, चिंचवडगाव येथील ७९०.३५ हेक्टर, हरिश्चंद्र पिंपरी येथील ९६८.२१ हेक्टर, साळींबा येथील ५६२.८७ हेक्टर तर चिंचाळा येथील १३८०.२७ हेक्टर अशाप्रकारे एकूण ६ गावातील ५ हजार ८६४ हेक्टर एवढी शेतजमीन सिंचनाखाली येणार असून हा प्रकल्प पूर्णत्वास गेल्यास वडवणी तालुक्यातील एकूण शेतजमिनी पैकी जवळपास ८० ते ९० टक्के शेतजमीन ही सिंचनाखाली येणार आहे. विशेष म्हणजे या योजनेसाठी शेतकऱ्यांची कसल्याही प्रकारची जमीन संपादित करण्याची आवश्यकता नसून माजलगांव जलाशयातून बंद नलिकेव्दारे हे पाणी शेत जमिनींना दिले जाणार आहे. प्रत्येकी २ हेक्टर अंतरावरील ठिकाणी १ पाण्याचा आऊटलेट पॉईंट काढला जाणारा असून तेथून हा पाणीपुरवठा आजूबाजूच्या शेत जमिनीला केला जाणार आहे. या योजनेच्या मान्यतेसाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. ही मराठवाड्यातील सर्वात मोठी जल उपसा सिंचन योजना ठरणार असून विशेष म्हणजे यासाठी लागणारी संपूर्ण वीज ही सौरऊर्जेपासून निर्माण होणार असून यासाठी २५ कोटी रुपये खर्चाचा सौर ऊर्जा प्रकल्प देखील याठिकाणी उभारला जाणार आहे. परिणामी विजेचा संपूर्ण खर्चही वाचणार आहे. या योजनेमुळे सिंचनाची शाश्वत सोय असल्याने येथील शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न वाढीस निश्चितपणे हातभार लागणार असून वडवणी तालुक्यातील या प्रकल्पामुळे तालुक्यातील जवळपास ९० टक्के जमीन ही सिंचनाखाली येणार आहे. भविष्यात वडवणी तालुका हा बागायतदारांचा तालुका म्हणून ओळख निर्माण होणार असून सदरील योजना लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्याचे उद्दिष्ट आहे. या योजनेसाठी जवळपास ३५० ते ४५० कोटी रुपये अंदाजे खर्च होणार असून या प्रकल्पामुळे वडवणी तालुक्याच्या वैभवात निश्चितपणे भर पडणार आहे. मात्र शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनाव्दारे शेतीला पाणीपुरवठा केल्यास पाण्याची बचत होईल व सर्वांना चांगल्या प्रकारे शेती करता येईल हेही लक्षात घेतले पाहिजे. बारमाही कोरडवाहू असलेली शेती ओलिताखाली आणण्यासाठी साळींबा उपसासिंचन योजना ही सदर भागातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असून शेतकऱ्यांच्या पाण्याच्या गरजा भागविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. हीच गरज लक्षात घेता मागील एक वर्षापासून या भागाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी हा प्रश्न शासन दरबारी लावून धरलेला होता. त्यांच्याच परिश्रमातून ही योजना मंजूर झाली असून आता मार्गीही लागत आहे. केवळ त्यांच्यामुळेच या योजनेस मूर्त स्वरुप आले असून ओमप्रकाश शेटे हे कोणत्या आधारावर या योजनेचे श्रेय घेत आहेत हे समजणे अकल्पनीय आहे. त्यामुळे त्यांचा यातील सहभाग म्हणजे बेगानी शादी में अब्दुल्ला दिवाना असेच आहे. त्यामुळे ओमप्रकाश शेटे यांनी अशाप्रकारे जनतेची अजिबात दिशाभूल करु नये, नसता त्यांच्या खोटारडेपणा विरोधात जन आंदोलन करण्यात येईल असे स्पष्ट मत वडवणी नगरपंचायतीचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी व्यक्त केले.

## आखेर समिती व समाजामध्ये एक मुखी ठराव मंजूर

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा समितीची बैठक संपन्न

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळ्याचे रविवारी २७ जुलै ला होणार अनावरण

**अहिल्यानगर । ईश्वर निमसे**

शहरातील मार्केटयार्ड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्या संदर्भात अनेक दिवसांपासून शहरात अनावरणाची चर्चा सुरू होती या अनुषंगाने पुतळा कृती समिती व आंबेडकरी समाजाच्या वतीने आज बैठक घेण्यात आली या बैठकीत एक मताने निर्णय घेऊन येणाऱ्या २७ जुलै ला रविवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण संध्याकाळी ६ वाजता थाटात साजरा होणार असल्याचे बैठकीचे अध्यक्ष विजय भांबळ यांनी व्यक्त केले यावेळी आमदार संग्राम जगताप, पूर्ण कृती पुतळा समितीचे सुरेश बनसोडे, सुमेध गायकवाड, अजय साळवे, नाथा अल्हाट, किरण दाभाडे, प्रशांत गायकवाड, प्रा.जयंत गायकवाड, सुनील शिंदे, विशाल कांबळे, संजय जगताप, विशाल गायकवाड, ॲड. संदीप पाखरे, विजय गायकवाड, महेश भोसले, पोपटराव जाधव, रवींद्र कांबळे, प्रा. जाधव सर, सिद्धार्थ आढाव, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, समीर भिंगारदिवे, शिवाजी भोसले, नगरसेवक विजय गव्हाळे, शिवाजी साळवे, नितीन कसबेकर, गौतमीताई भिंगारदिवे, बाळासाहेब निकम, संजय साळवे, अंकुश मोहिते, सागर ठोकळ, पप्पू पाटील, सागर विधाते, भीम वाघचौरे, सुजन भिंगारदिवे, दीपक लोंढे, सिद्धांत गायकवाड, गणेश गायकवाड, शांतवन साळवे, दया गजभिये, निखिल सूर्यवंशी, शैनेश्वर पवार, रुपेश शेलार, सुभाष वाघमारे, रुपेश लोखंडे, वैभव आवटे, बापू पाचारणे, अक्षय बोरुडे, प्रकाश वाघमारे, दीपक सरोदे, ऋषी विधाते, दीपक साळवे, येशुदास वाघमारे, प्रवीण कांबळे, ऋषी कराळे, मंगेश मोकळ , दीपक गरुड आदीसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीमध्ये सर्व समाज बांधवांनी आपापले विविध मत व्यक्त करून एकमुखी ठराव मंजूर करण्यात आला व २७ जुलै १९७८ रोजी महाराष्ट्राच्या विधिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरांचा ठराव झाला होता त्याच दिवसाचे औचित्य साधून येणाऱ्या २७ जुलैला ऐतिहासिक विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण मोठ्या थाटात होणार असल्याचे सांगितले व यावेळी आंबेडकरी चळवळी मधील नेते मंडळी प्रमुख पाहुणे समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे सांगितले.



# सिताचंद्र प्रतिष्ठान कडून दीपाताई क्षीरसागरांचा गौरव

**बीड (प्रतिनिधी)**–गेली पाच–सहा दशकापासून बीड शहराच्या शैक्षणिक ,सांस्कृतिक , अध्यात्मिक , राजकीय क्षेत्रात तन–मन–धनाने काम करणाऱ्या डॉ.दीपाताई क्षीरसागर यांचा सिताचंद्र ऑडिओ ड.ग्रुपच्यावतीने गौरव करण्यात आला. बीड जिल्हा हा कलावंतांचा जिल्हा आहे हे सर्व महाराष्ट्राला श्रुत आहे. त्या कलावंतांच्या भूमीमध्ये उदयोन्मुख कलावंतांना मुंबई ,पुणे, कोल्हापूर सह विविध सांस्कृतिक शहरात व्यासपीठ निर्माण करून देणाऱ्या आणि सातत्याने प्रयत्नशील असणाऱ्या अखिल भारतीय नाट्य परिषद बालरंग भूमी परिषद आणि बीड नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्ष डॉ दीपाताई क्षीरसागरांचा सौ.केशरबाई सोनाजीराव शिरसागर अखिल भारतीय नाट्य परिषद आणि बालरंग भूमी परिषद यांनी आयोजित केलेल्या अभंगवाणी या भक्ति प्रधान संगीतमय कार्यक्रमांमध्ये शुभकार्यास मात्र मुग्ध करणाऱ्या आशयघन उजवी आवाजात निवेदनासह सर्व व्यवसायाच्या जाहिराती करणाऱ्या सिताचंद्र ऑडिओ ऍडव्हर्टाईजच्यावतीने महाराष्ट्राच्या पालखी सोहळ्याच्या क्षणांनी सजवलेल्या छायाचित्रावर डॉ.सौ दीपाताई क्षीरसागर यांच्या कर्तृत्वाचा ठसा अक्षरांनी चित्रित केलेली फ्रेम देऊन गौरव करण्यात आला. डॉ.सौ दीपाताई क्षीरसागर यांना दिलेली फ्रेम ही निवेदक सुरेश साळुंके यांनी अतिशय कल्पकतेने तयार



केली आहे. ज्यामध्ये पालखी सोहळाचा परमोच्च आनंदबिंदू आसलेले रिंगण चित्रित केले आहे.तर त्याच रिंगणामध्ये शांत शितल मृदू भाषीक ओजस्वी प्रतिभा धारण केलेल्या डॉ. दीपाताई क्षीरसागरांचे छायाचित्र चित्रीत केले आहे. त्याच्याच बाजुला डॉ .दीपाताईचे अवघे व्यक्तीमत्व अधोरेखित करणारे निवेदक सुरेश साळुंकेंनी काव्य लिहिले आहे.अभंगवाणी या कार्यक्रमासाठी बीड शहरातील संगीत क्षेत्रामध्ये योगदान देणाऱ्या अनेक संगीत क्लासचे संचालक , बालगायक आणि त्यांचे पालक उपस्थित होते. या क्षणी बोलताना डॉ.सौ.दी शपाताई क्षीरसागर म्हणाल्या मला जे मिळालं ते माझ्याकडे राहू नये ते समाजामध्ये निरंतर वाहत रहावे या भावनेने मी काम करत आले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमातुन मिळणारा आनंद आणि ऊर्जा हि अलौकिक आहे.माझे सर्व सांस्कृतिक ,धार्मिक, अध्यात्मिक कार्याचे वर्णन करणारा हा माझा गौरव मी माझे स्वर्गीय आई–वडीलांसह आईवडिलतुल्य काकू–नानांना समर्पित करते.निवेदक सुरेश साळुंके यांनी माझ्या आई–बाबांचे सुहासिनी आणि यशवंत हे शुभंकर नाव कवितेत अतिशय चपखलपणे मडवले आहे याचा माला आनंद आहे.तर कवितेत अधोरेखित केलेला योगेश–पुजा....मी तुमच्यामुळे आई झाले हा माझा कृतज्ञभाव सुखावणारा आहे. कार्यक्रमासाठी प्राचार्य शिवानंद क्षीरसागर,सुरश्री भरत लोळगे,डॉ.संजय पाटील

, नामदेव साळुंके,अनिता शिंदे,राहुल सोनवणे ,दीपक जमदाडे, विजय राख ,सुरेश थोरात ,दुष्यंत रामटेके ,गुलाबताई लोळगे, विवेक काटे, महेश कुलकर्णीसह बीड शहरातील अनेक जेष्ठ श्रेष्ठ गायक कलावंत उपस्थीत होते.

# महात्मा गांधी हे विचार आहेत ते कधीही संपत नसतात–बजगुडे



**बीड (प्रतिनिधी)**–बीड येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन पुणे येथे झालेल्या महात्मा गांधी यांच्या पुतळ्याच्या विटंबना प्रकरणी निषेध व्यक्त करत सुरज शुक्ला नामक माथेफिरूवर कठोरात कठोर शासन करण्याची मागणी काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली. यावेळी काँग्रेसचे बीड तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी गांधीजींच्या विटंबनेचा निषेध व्यक्त करत गांधी हा विचार असुन तो कधीही संपत नसतो अशी प्रतिक्रिया व्यक्त केली यावेळी बीड काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील, शहराध्यक्ष परवेझ कुरेशी, संतोष निकाळजे, रामधन जमाले, अशोक बहिरवाळ, ड. विशाल मस्के, मिलिंद मस्के, शेख अमीर, कादर बबामिया इनामदार, रणजित शेळके, बीड शहर बचाव मंचचे नितीन जयभाय यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कालिया यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण हा माझा गौरव–राजेश समेळ

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**–योगेश्वरी शिक्षण संस्था अंतर्गत गेल्या २५ ते ३० वर्षापासून एक पेड शहीदों के नाम हा उपक्रम राबविण्यात येतो एक जुलै ते सतरा सप्टेंबर पर्यंत जवळपास ५३० वृक्ष लावून ऑक्सिजन पार्क ची निर्मिती ही करण्यात आली आहे. प्रत्येक वर्षी राष्ट्रीय छात्रसेनेचे छात्र सैनिक श्रमदानातून वृक्षारोपण करून पर्यावरण राष्ट्रभक्ती हा उपक्रम जाणीवपूर्वक राबवतात त्याचे कारण असे की कारगिल युद्धात ५३० जवान शहीद झाले त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ वृक्षारोपण करून आदरांजली अर्पित केली जाते. हा अनोखा उपक्रम लौकीकार्थ आहे या उपक्रमाचा प्रारंभ कारगिल युद्धात प्रत्यक्ष लढलेले ठाणे येथील नौसेना अधिकारी राजेश समेळ यांच्या हस्ते योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या योगेश्वरी वस्तीगृह परिसरात करण्यात आली.

या युद्धात पहिला शहीद हा हिमाचल प्रदेशचा सौरभ कार्य त्याच्या स्मरणार्थ वटवृक्ष लावून सुरुवात करण्यात आली यावेळी राजे समय भावुक झाले होते. सौरभ कालिया सारखे ५३० जवान शहीद झाले त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ वृक्षारोपण करण्याचे भाग्य मला लाभले मी धन्य झालो खरोखरच हा उपक्रम सातत्याने अनेक वर्षापासून संस्था राबवते व शहिदांच्या स्मृती प्रित्यर्थ वृक्षारोपणाच्या माध्यमातून ऑक्सिजन पार्क ची निर्मिती करणारी योगेश्वरी शिक्षण संस्था भाग्यवान आहे ह्या उपक्रमातून नुसते वृक्षारोपणच होत नाही तर त्याचे संगोपन आणि संवर्धन केल्या जाते संस्थेच्या पस्तीस एकर परिसरात वृक्ष फुलताना, डोलताना दिसतात प्रामुख्याने सांगायचे तर राष्ट्रभक्तीने हा परिसर फुलून गेला आहे आणि या उपक्रमातून जवानाचा सन्मान केला जातो ही फार मोठी गोष्ट आहे. असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्रा.भीमाशंकर शेटे म्हणाले की, हा भाग पूर्वी खडकाळ होता संस्थेचे मार्गदर्शक डॉ. सुरेश खुरसाळे यांच्या मार्गदर्शनातून मेजर एस.पी.कुलकर्णी यांच्या नियोजनातून छात्र सैनिकांनी या परिसराचे नंदनवन केले ही संस्था शहिदांच्या स्मृती वेगळा उपक्रम राबवून त्यांना श्रद्धांजली अर्पित करते हे कार्य पुढे देखील असे चालू राहील. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेजर एस.पी.कुलकर्णी संचालन दत्ता बनसोडे व आभार अलका वक्टे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत गायनाने करण्यात आली.

# कलंबर येथे आषाढी एकादशी सोहळा संपन्न

**लोहा (प्रतिनिधी)**–श्री.संत निवृत्ती महाराज व श्री संत मोतीराम महाराज संस्थान कलंबर ता. लोहा जि. नांदेड येथे मोठ्या भक्ती भावाने आषाढी एकादशी सोहळा २०२५ संपन्न झाला. सकाळी ६ वाजता अभिषेक व महापूजा शिवराज महाराज यांच्या हस्ते संपन्न झाला .सकाळी ७ वाजता दर्शनाला सूरूवात झाली.सकाळी ११ वाजता ग्रंथ पारायण करण्यात आले. यावेळी वाचक नागोराव पाटील तर सूचक आत्माराम पांचाळ होते. दुपारी १ वाजता ह.भ.प. बापूराव महाराज मोरे यांचे प्रवचन संपन्न झाले त्यांनी संताचे कार्य माणसाच्या जीवनात अत्यंत उपयोगी असून माणूस असणं आणि माणसामध्ये माणुसकी असणे हें महत्वाचे गुण असणे आवश्यक असते.श्रोत्ये मंत्रमुग्ध होऊन गेली होती.दुपारी ३ वाजता महाआरती करण्यात आली .यावेळी महाआरती चा मान मोकलेवाडी येथील जोडप्यांना देण्यात आला.आलेल्या सर्व भाविक भक्तांना फराळ आणि चहा वाटप करण्यात आला.याप्रसंगी हजारो भाविक भक्त आले होते.आलेगाव, बामणी , मंगलसांगवी ,लाठ खुर्द , मोठी लाठी, भंडारकोमट्याचीवाडी, खुडेवाडी, पांगरा ,संगुचिवाडी,भोपाळवाडी, गुंडेवाडी , कलंबर खुर्द , कलंबर बु., तेलंगवाडी,भुतेवाडी येथील भाविक भक्त मोट्या संख्येने उवस्थित होते या धार्मिक सोहळ्यास सुरेश घोरबांड गुरुजी,पांडुरंग कोठेवाड ,गजानन घोरबांड ,सोपान पाटील,गना पाटील ,बाबू श्रीधर पाटील,नितीन पाटील यांनी कार्यक्रमास परीश्रम घेतले . सायं ६.३०.वाजता आरती करून सामूहिक पसायदान घेण्यात घेण्यात आले. संस्थानच्या वतीने सर्व भाविक भक्तांचे आभार मानण्यात आले.

# होऊ द्या एकदाचा महासंग्राम! २ काय ४ भाऊ एकत्र आले तरी आम्हाला फरक पडत नाही–भाजप आमदार प्रसाद लाड

**मुंबई । वृत्तसंस्था**

दोन काय चार भाऊ एकत्र आले तरी भाजपला काहीही फरक पडत नाही. एकदा होऊन जाऊ द्या महासंग्राम, अशा शब्दांत भाजप आमदार प्रसाद लाड यांनी सोमवारी विधिमंडळ परिसरात बोलताना ठाकरे बंधूंना टोला हाणला आहे.ठाकरे बंधू शनिवारी तब्बल १८ वर्षांनंतर एका व्यासपीठावर आले. यावेळी केलेल्या भाषणात उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख अनाजीपंत असा केला होता. अनाजीपंतांनी आमच्यातील आंतरपाट दूर केल्यामुळे आम्ही एकत्र आलो, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या टीकेनंतर भाजपच्या गोटातून ठाकरेंवर जोरदार हल्ला चढवला जात आहे. भाजप आमदार प्रसाद लाड यांनी सोमवारी विधिमंडळ परिसरात पत्रकारांशी संवाद साधताना ठाकरे बंधूंच्या मनोमिलनावर भाष्य केले. तसेच त्यांना समोरासमोरच्या लढाईचे आव्हान दिले.आम्ही वाटच पाहत आहोत. दोन भाऊ एकत्र येऊ द्या, होऊ द्या महासंग्राम. दोन भाऊ काय पुतणे, भाचे व अजून चार भाऊ हे सर्वजण एकत्र येऊ द्या. आम्ही तयार आहोत. विजयी मेळाव्यात उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्या भाषणात खूप फरक होता. उद्धव ठाकरे मराठीच्या मुद्यावर काय बोलले? त्यांनी मराठी सोडून गद्दार, धोका, खंजीर आदी शब्द आपल्या भाषणात वापरले, असे प्रसाद लाड म्हणाले.भाजप हा राष्ट्रीय पक्ष आहे. त्यामुळे आम्ही पूर्णपणे तयार आहोत. उद्धव ठाकरे हे राज ठाकरे यांना सोबत घेत आहेत. पण उद्धव यांनी ज्या प्रकारे राज यांचा अपमान केला होता. ते पाहता उद्धव त्यांची माफी मागणार का? मराठी भाषेचा सर्वांना अभिमान आहे. मराठी भाषेत बोलले पाहिजे. पण एखाद्याला मराठी येत नसेल तर हिंदी भाषिकांना मराठी बोलण्याची दादागिरी करत त्याला मारहाण करणे योग्य नाही, असेही लाड यावेळी म्हणाले. तत्पूर्वी, भाजप आमदार आशिष शेलार यांनी मराठीच्या मुद्यावरून राज व उद्धव ठाकरे यांच्यावर टीकास्त्र सोडले होते.दोन्ही ठाकरे बंधूंच्या भाषणात अप्रामाणिकपणा होता. विशेषतः उद्धव यांच्या भाषणात तडफड दिसत होती. राज व उद्धव या दोघांनीही देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानायला पाहिजे. राज ठाकरे यांची रस्त्यावर सत्ता असेल तर त्यांनी तिथे गोट्या खेळाव्यात, असे आशिष शेलार म्हणाले होते.उल्लेखनीय बाब म्हणजे राज ठाकरे यांनी विजयी मेळाव्यात बोलताना भाजपकडे विधिमंडळात सत्ता असली तरी आपली रस्त्यावर सत्ता असल्याचे म्हटले होते. हिंदीचा मुद्दा अचानक कुठून आला हे मला कळलेच नाही. हिंदीची जबरदस्ती लहान मुलांवर करता तुम्ही. कुणाला काही विचारायचे नाही. आमच्या हातात सत्ता आहे. मनात आले की लगेच लादणार. तुमच्या हातात सत्ता असेल ती विधान भवनात. पण आमच्याकडे रस्त्यावर सत्ता आहे, असा इशाराही राज ठाकरेंनी राज्य सरकारला दिला.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077